महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड- अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, पि.नं. ४०२ २०१
दुरधवनी क्र. ०२१४१- २२२११८, फॅक्स क्रमांक ०२१४१- २२७४५१,
ई-मेल - tahasildargadraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-१/जिपपंस/सभापती आरक्षण/२०२५ दि. ०३/१०/२०२५

**निवडणूक तात्काळ**

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग
२. उप विभागीय अधिकारी (सर्व)
३. तहसिलदार (सर्व)
४. गटविकास अधिकारी (सर्व)
५. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
६. जिल्हा माहिती अधिकारी, रायगड

विषयः- जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०२५
**सभापती आरक्षण सोडत.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब असाधारण क्रमांक ३१७ दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक २०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडून पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता आरक्षण जाहीर करण्यात आलेले आहे.

शासन निर्देशानुसार रायगड जिल्हयातील १५ पंचायत समितींच्या सभापती पदाचे आरक्षण निश्चित करण्याकरिता **दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड** येथे विशेष सभा अयोजित करण्यात आलेली आहे. तरी सोबत दिलेले जाहीर प्रकटनाची प्रत आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी. तसेच याबाबत आपल्या स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. व त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(किशन ना. जावळे)
**जिल्हाधिकारी रायगड**

प्रतः-१. मा.राज्य निवडणूक आयोग, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांना माहिती करिता सविनय सादर.
२. मा.ग्राम विकास विभाग, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांना माहिती करिता सविनय सादर.
३. मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन कोकण यांना माहिती करिता सविनय सादर.

(किशन ना. जावळे)
**जिल्हाधिकारी रायगड**

# जाहीर प्रकटन

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब असाधारण क्रमांक ३१७ दिनांक ९ सप्टेंबर २०२५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ अन्वये महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाने क्रमांक/जिपनि-२०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२, दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब असाधारण क्रमांक ३१७ दिनांक ९ सप्टेंबर २०२५ मधील ग्राम विकास विभागाची अधिसूना क्रमांक/जिपनि-२०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२, दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ नुसार रायगड जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील १५ पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण अडीच वर्षाच्या कालावधीकरिता खालील प्रवर्गाप्रमाणे निश्चित करुन देण्यात आले आहे.

| अ. क्र. | जिल्हा चे नाव | पंचायत समित्या | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांचा मागास प्रवर्ग | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | अ | ब | अ | ब | अ | ब |
| | | | अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जाती (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पं.स. च्या सभापती पदांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **१** | **रायगड** | **१५** | **००** | **०१** | **०१** | **०१** | **०२** | **०२** | **०४** | **०४** |

तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे १५ पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण निश्चित करणेकामी खाली दर्शविल्या प्रमाणे विशेष सभा आयोजित केली आहे.

| अ. क्र. | आरक्षण सोडतीचे ठिकाण | आरक्षण सोडतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| **१** | **नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड,** | **गुरुवार, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी ३-०० वाजता.** |

रायगड जिल्ह्यातील नागरिक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, वृत्तपत्रांचे पत्रकार यांनी सदर आरक्षण सोडत सभेस वरिल वेळी व ठिकाणी उपस्थित रहावे.

जिल्हा – रायगड
दिनांक – ०३/१०/२०२५

(किशन ना. जावळे)
**जिल्हाधिकारी रायगड**